INTERNATIONAL INDIAN SCHOOL DAMMAM

MIDDLE SECTION

TERM–II, DECEMBER- 2017-18

MARATHI, CLASS-VI

TIME: 3 HRS MARKS :80

---

INSTRUCTIONS:

1. Read the questions carefully
2. Number the question correctly in your answer sheet as given in the question.

---

**Q.1. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. (1 X 10 =10)**

१. बाबांच पत्र या पाठाचे लेखक ----------- आहेत.( एकनाथ आव्हाड, सोमनाथ आव्हाड )

२. उद्या आगगाडीने ---------- गावाला जायचे. ( मामाच्या, काकाच्या )

३. शुध्द शब्द शोधा व लिहा. ( सरप / स्पर्श )

४. कृपया शब्द आपण कधी वापरतो. ( विनंती करतांना / चुगली करतांना )

५. नाम ओळखा व लिहा. १. समोरुन बैल येत होता.

६. ठिक-या व चेंडू सोबत कोणता खेळ खेळतात? ( लगोरी / फुटबॉल )

७. चुक की बरोबर ते लिहा. १. खेळता खेळता सात मुली नदी कडे गेल्या?

८. खालील वाक्यात योग्य विशेषण लिहा. १. हिमालय ------- पर्वत आहे. ( उंच/ छोटा )

९. पी.टी म्हणजे शारीरीक व्यायाम / मानसीक व्यायाम

१०. बाबांनी बाजारातुन सात केळी आणल्या.( विशेषण ओळखा व लिहा.)

**Q.2. शब्दार्थ लिहा: (ANY5)** [5]

१. लुकलुकणे २. माघारी ३.गुरफटणे ४. शतक ५. निराश ६.भारी

**Q.3. समानार्थी शब्द लिहा: (ANY5)** [5]

१. वारा २. साहस ३. अवघड ४. दार ५.बातमी ६. उडी

**Q.4. विरुध्दार्थी शब्द लिहा: (ANY 5)** [5]

१. प्रसन्न २.हसणे ३.उशीर ४. गोड ५. खुले ६. जवळ

**Q.5. लिंग बदला : (ANY 5)** [5]

१.पुरुष २. बैल ३.आजी ४.मित्र ५.दोर ६.मामा

**Q.6. वचन बदला: (ANY 5)** [5]

१.छत्री २. हाक ३.किल्ला ४. बाई ५. पाटी ६.बातमी

**Q. 7.खालिल अशुदध शब्द शुदध करा. (ANY 5)** [5]

१.सूखरूप २. अपयशि ३.संकलपना ४.सटेशन ५.दपतराचे ६. फकत

**Q. 8 जोड्या जुळवा** [3]

| | | |
|---|---|---|
| १. आगगाडी | केकाराव | (  ) |
| २. पैंजण | खुळखुळ | (  ) |
| ३. घुंगरुमाळा | खडखड | (  ) |
| ४. बैलगाडी | झुकझुक | (  ) |
| ५. पाणी | खळखळ | (  ) |
| ६. मोर | छुमछुम | (  ) |

**Q. 9 खालील वाक्यातील विशेषण ओळखा व लिहा.** [6]

१. गुलाबाचे फुल नाजुक आहे,

२. आंबा गोड आहे.

३. गंगा नदी लांब आहे.

४. अमुल दूध ताजे आहे.

५ ससा कापसासारखा दिसतो.

६. कंपास घ्यायला आईने मला शंभर रुपये दिले.

**Q. 10 नाम सर्वनाम ओळखा व लिहा.** [5]

१. सुधा गुणी मुलगी आहे. ती रोज अभ्यास करते.

२. सरोज आणि स्मिता चांगल्या मैत्रिणी आहेत, त्या छान गाण म्हणतात.

३. राहुल घरी आला त्याने एक भेट वस्तु दिली मला आवडली.

४. पंकजने परिक्षेत पहिला नंबर मिळवला.

५. कुमारला हाक मारली .

## Q.11 एका वाक्यात उत्तरे लिहा. (Any 7) [1x7 =7]

१. मुलाने बाळाला मांडीवर का घेतले?
२. चंद्रावरची शाळा कोणत्या शतकात भरेल?
३. रिमाने आनंदाने उड्या का मारल्या?
४. कोणत्या झाडाखाली सगळ्या मैत्रिणी हासत व बागळत होत्या?
५. बाबांनी दूरध्वनीवरून बोलणे का पसंत केले नाही?
६. चंद्रावरच्या शाळेत जाताना कशाचे ओझे नसेल?
७. चंद्रावरच्या शाळेत अभ्यास कसा करावा लागेल?
८. कुंदा केव्हा पोहायला शिकली?

## Q.12 थोडक्यातउत्तरेलिहा. (Any 2) [2x2=4]

१. सुट्टी कधी संपली हे आम्हाला समजलेच नाही? असे मुलाला का वाटले?
२. कुंदाला नदीवर कोणते दृश्य दिसले?
३. गणित विषय वैष्णवीचा लाडका होण्यासाठी बाबांनी कोणते उपाय सुचवले आहेत?

## Q. 13 खालील उतारा वाचा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा. (1x5=5)

एक होती नदी. तिच्यात होते खूप खूप पाणी. निळे निळे , थंडगार व स्वच्छ! ईतके स्वच्छ की वरून पाहिले,की तळाची वाळू दिसायची गोल गोल गोटे दिसायचे अन सुळसुळ पोहणारे छोटे मासेही दिसायचे. माशांच्या समूहात राहायची मिनू मासळी! मिनू होती ईवलीशी. अगदी तुमच्या हाताच्या छोट्या बोटाएवढी. रुपेरी कल्ल्यांची! इतर मासे तिचे खूप खूप लाड करायचे. तिला क्षणभर नजरेआड होऊ द्यायचे नाहीत; पण मिनूला नदीच्या त्या खोलगट भागात राहायचा कंटाळा आला होता.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. नदीचे पाणी कसे होते?

२. तळाशी काय दिसायची ?

३. मासळीच नाव काय होते?

४. मिनूला कुठे राहण्याचा कंटाळा,यायचा?

५. मिनू कशी होती?

**Q.14 खालील उतारा वाचा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[1x5=5]**

**छोट्याशा गावात धनाशेटचे किराणा मालाचे दुकान ब-यापैकी चालत होते.गेल्या दोन वर्षापासून धंद्याला बरकत आल्यामुळे तालुक्याच्या बँकेत बरीच पुंजी जमा झाली होती. बायकोच्या आग्रहामुळे धनाशेटनी बालाजीच्या दर्शनासाठी जायचे ठरवले. त्यासाठी तालुक्याला येऊन आरक्षणाची तिकिटे काढली होती. बँकेतुन रोख रक्कम काढून दुकानासाठी खरेदीही केली होती.बाजाराचा दिवस असल्यामुळे बसस्थानकावर बरीच गर्दी होती.**

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. धनाशेटचे कशाचे दुकान होते?

२. धनाशेटनी कोणाच्या दर्शनासाठी जायचे ठरवले?

३. दिवस कशाचा होता?

४. धनाशेटची तालुक्याच्या बँकेत काय जमा झाली होती?

५. इंग्रजी अर्थ लिहा. १. छोट्याशा २. गर्दी

Q.15 निबंध लिहा . निसर्ग माझा सोबती **[5]**

*********************************